## विधि व न्याय विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ९ जुलै २०१९

### अधिसूचना

**फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३.**

क्रमांक सीआरसी. ०४१३/४६६/प्र.क्र. ८७/कार्यासन ११.—फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) महाराष्ट्र राज्याला लागू असताना, त्याच्या कलम ७ चे पोट-कलम (१) तसेच कलम ९ याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, आणि याबाबतीत यापूर्वी काढलेल्या सर्व शासकीय अधिसूचना जेथवर अहमदनगर जिल्ह्यातील श्रीगोंदा, कर्जत व जामखेड या महसुली तालुक्यांशी संबंधित असतील तेथवर, त्या सर्व अधिसूचनामध्ये अंशतः फेरबदल करून, महाराष्ट्र शासन, मुंबई येथील उच्च न्यायालयाशी विचार विनिमय करून याद्वारे, दिनांक १४ जुलै २०१९ पासून अहमदनगर जिल्ह्यातील श्रीगोंदा, कर्जत व जामखेड या महसूल तालुक्याकरिता सत्र विभाग तसेच श्रीगोंदा येथे सत्र न्यायालय निर्माण करीत आहे आणि उक्त सत्र विभागांच्या सीमांच्या आत उद्‌भवणाऱ्या प्रकरणांची न्यायचौकशी करण्यासाठी श्रीगोंदा येथील सत्र न्यायालयाचे अतिरिक्त सत्र न्यायाधीश हे पीठासीन अधिकारी असतील तसेच सत्र न्यायाधीश, अहमदनगर हे श्रीगोंदा सत्र न्यायालयाचे देखील सत्र न्यायाधीश असतील आणि त्यांना योग्य वाटतील अशी कोणतीही प्रकरणे, उक्त सत्र विभागातील प्रकरणे स्वतःकडे घेण्याचा अथवा सक्षम अधिकारिता असणाऱ्या दुसऱ्या कोणत्याही न्यायालयाकडे सोपवण्याचा किंवा त्यांना श्रीगोंदा येथील अतिरिक्त सत्र न्यायाधीश यांच्याकडे सोपवण्याचा अधिकार असेल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**यो. ही. आमेटा,**

शासनाचे सह सचिव.